सकाळ

Date: 10 February 2010; Page:06; Edition: Nagpur

# 'आयपीएल'चा ज्वर आता मोठ्या पडद्यावर

## चारुहास साटम : यूएफओ मुव्हिजचे साहाय्य; जाहिरातींचा अडथळा नाही

नागपूर, ता. ९ : आजवर घराघरातल्या छोट्या पडद्यावर दिसणाऱ्या डीएलएफ आयपीएल क्रिकेट सामन्याचा ज्वर आता मोठ्या पडद्यावर दिसणार आहे. यामुळे स्टेडियमसारखी मस्ती थिएटरमध्ये अनुभवता येईल. यूएफओ मुव्हिजचा हा उपक्रम आहे. या माध्यमातून पहिल्या टप्प्यात देशातील ५५० शहरांमधील थिएटर्समध्ये सामने दाखविण्यात येतील, अशी माहिती यूएफओ मुव्हिज इंडिया लिमिटेडचे सल्लागार चारुहास साटम यांनी पत्रकारांना दिली.

'डीएलएफ आयपीएल'चे सर्वच सामने हाय डेफिनीशन डिजिटल फॉरमॅटमध्ये कोणत्याही व्यावसायिक जाहिरातीच्या अडथळ्यांशिवाय दाखविले जातील. यामुळे थिएटर्स, मल्टिप्लेक्सच्या महसुलात वाढ होऊ शकेल. यूएफओच्या माध्यमातून सामना पाहणाऱ्या प्रेक्षकांसाठी थिएटर्समध्ये स्टेडियमसारखाच आनंद देण्याची योजना आहे. थिएटरमध्ये क्रिकेटशी संबंधित वस्तूंची देवाणघेवाण, आकर्षक भेटीसह स्वादिष्ट खाद्यांचे स्टॉल्स राहतील. या वातावरणाला अधिक आकर्षक बनविण्यासाठी प्रत्येक पडद्यांच्या शेजारी चिअर लिडर्स आणि बॅण्ड पथक राहील. यामुळे सामने प्रत्यक्ष स्टेडियमवर पाहत असल्याचा भास होईल. या कार्यक्रमाचे संचालक रेडीओ जॉकी करणार आहे. प्रेक्षकांसाठी वेगवेगळ्या स्पर्धाही ठेवण्यात येतील आणि यातील विजेत्यांना राष्ट्रीय स्तरावर विविध थिएटर्समधून पडद्यावर दाखविण्यात येईल. सतत ४५ दिवसांपर्यंत सामने दाखविण्यात येणार आहेत. अतिशय वाजवी दरात प्रेक्षकांना तिकीट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यूएफओने सिनेमॅक्स, आयनॉक्स, फेम, पीव्हीआर आणि इतरही एकच पडदा असलेल्या थिएटर्ससोबत करार केला आहे. यामुळे १२ मार्चपासून डीएलएफ आयपीएल ट्वेंटी-२० चे सामने छोट्या पडद्यावर पाहणे शक्य होईल. यूएफओसोबत देशातील १७०० पेक्षा अधिक डिजिटल पडदे जोडले गेले आहेत. आयपीएलने थिएटर्समध्ये सामने दाखविण्यासाठी क्राऊन इन्फोटेन्मेंटशी करार केला आहे. त्यांच्याजवळ आयपीएल २०१०-२०१९ पर्यंतचे वितरणाचे हक्क आहेत. कंपनीने आतापर्यंत ५५० पेक्षा अधिक पडद्यांसोबत करार केला आहे.

### येथे दिसणार सामने

**नागपूर** : जयश्री टॉकिज, जसवंत तुली मॉलमधील आयनॉक्स, पूनम मॉल आणि सिनेमॅक्स. **अमरावती** : प्रभात टॉकिज. **वरुड** : केदार टॉकिज, **मोर्शी** : अल्फा, **चांदूरबाजार** : वैष्णवी चित्रमंदिर, **यवतमाळ** : श्याम टॉकिज, **आर्णी** : हरी टॉकिज, **दारव्हा** : प्रभात टॉकिज, **पुसद** : बरखा टॉकिज, **उमरखेड** : संजय टॉकिज, **वणी** : विराणी टॉकिज, **मलकापूर** : श्री हनुमान टॉकिज, **अकोला** : न्यू वसंत टॉकिज, **अकोट** : श्रीनिवास, **खामगाव** : मोहन सिनेमा, **गोंदिया** : प्रभात टॉकिज